स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। मंगळवार ।

दि. 14 एप्रिल 2026 ।

**PRIYADARSHANI SCHOOL & JR. COLLEGE**
MOSHI

## 43 YEARS OF NURTURING VALUES, EXCELLENCE AND TOMORROW'S LEADERS.



## ADMISSIONS OPEN 2026-27

Nursery to Grade 5

### WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

+91 9890613333 | +91 9373073077

pgosm05@gmail.com www.priyadarshanischoolmoshi.in

# सव्वा दोन लाखांचा भेसळयुक्त मँगो पल्प जप्त

## मावळ आणि खेड तालुक्यात अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने पुणे जिल्ह्यात कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत मावळ आणि खेड तालुक्यांमध्ये केलेल्या कारवायांमध्ये २ लाख २३ हजार १९६ रुपये किमतीचा भेसळयुक्त मँगो पल्प आणि त्यासाठी वापरले जाणारे हानिकारक पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.**



प्रशासनाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, पथकाने मावळ तालुक्यातील उर्से येथील मोहम्मद एकरामुल उर्फ अक्रम गुलाम या आस्थापनेवर छापा टाकला. या ठिकाणी कोणताही परवाना नसताना आणि धोकादायक रंग व इतर पदार्थांचा वापर करून मँगो पल्प तयार केला जात असल्याचे उघड झाले. तपासणी दरम्यान मँगो पल्प, मँगो फ्रूट आणि पल्प तयार करण्यासाठी वापरली जाणारी साखर, गायीचे दूध व केशर कलर लिक्वीड सोल्युशन यांसारखे भेसळकारी पदार्थ आढळून आले. अन्न व औषध प्रशासन विभागाने या पदार्थांचे सहा नमुने तपासणीसाठी घेतले. उर्वरित एक लाख ६१ हजार ८१६ रुपये किमतीचा ३२८२.९ किलो साठा जप्त करून नष्ट करण्यात आला आहे.

मावळमधील उत्पादकाने हा साठा खेड तालुक्यातील राजगुरुनगर येथील अविष्कार एन्टरप्रायझेसला पुरवल्याचे तपासात समोर आले. प्रशासनाने तातडीने या ठिकाणचीही तपासणी केली आणि तेथून ६१ हजार ३८० रुपये किमतीचा ५५८ किलो मँगो पल्प जप्त केला. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त श्रीधर डुबे पाटील आणि सह आयुक्त डी. व्ही. भोगावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त एन आर सरकटे, अन्न सुरक्षा अधिकारी बी. ए. शिंदे, एस. डी. मस्के, पी. एस. कच्छवे, सतिश हाके यांनी केली.

> उन्हाळी मोहिमेदरम्यान विक्री होणाऱ्या अन्न पदार्थांमध्ये भेसळीचा संशय आल्यास नागरिकांनी प्रशासनाला तात्काळ माहिती द्यावी. कोणत्याही फळ विक्री किंवा ज्युस उत्पादकांनी विना परवाना व्यवसाय करू नये. अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ नुसार विना परवाना व्यवसाय केल्यास १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.
>
> **- डी. व्ही. भोगावडे, सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे.**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आजही दिशा देणारे; तज्ज्ञांचे मत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आजही आधुनिक भारताच्या परराष्ट्र धोरणाला दिशा देणारे ठरत असून, जागतिकीकरणाच्या युगात शिक्षण व रोजगाराच्या नव्या संधी शोधताना त्यांच्या दूरदृष्टीची प्रासंगिकता अधिक ठळकपणे जाणवते. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समतेचा आग्रह धरणाऱ्या त्यांच्या विचारसरणीमुळे भारतीय युवकांनी जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होण्यासाठी व्यापक दृष्टीकोन स्वीकारणे आवश्यक आहे, असे मत 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आणि सद्यस्थिती तसेच परदेशातील शिक्षण व रोजगार संधी' या विषयावर आयोजित परिसंवादात तज्ज्ञांनी व्यक्त केले.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आणि सद्यस्थिती तसेच परदेशातील शिक्षण व रोजगार संधी' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

या परिसंवादात परदेशातून नंदू मोरे (बेल्जियम), डॉ. शैलेश कोळेकर (डेन्मार्क), रेवा रॉय (कॅनडा), विरेंद्र घुटके (स्वीडन), धम्मचारी सुदिप्ता (इंग्लंड) यांनी दृकश्राव्य माध्यमाद्वारे सहभाग घेतला तर प्रा. डॉ. संजय खोब्रागडे (नागपूर), प्रा. केशव वाघमारे (संशोधक), प्रा. डॉ. अशोक गायकवाड (प्राचार्य, कला, वाणिज्य, बी.बी.ए. महाविद्यालय, वडगाव मावळ), प्रा. डॉ. नितीश नवसागरे (विधी महाविद्यालय, पुणे), प्रा. रोनके राम (पंजाब विद्यापीठ), प्रा. विवेक कुमार (जेएनयू, दिल्ली) हे देखील उपस्थित होते.

यावेळी महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड उपस्थित होते.

परदेशातील शिक्षण व रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करताना नंदू मोरे यांनी जागतिक स्तरावर बदलत असलेल्या कौशल्यांच्या गरजेवर भर दिला. प्रोग्राम मॅनेजमेंट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ॲनिमेशन, डेटा सायन्स आणि डेटा ऑटोमेशन या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. यासोबतच उत्तम संवादकौशल्य (कम्युनिकेशन स्किल्स) हे जागतिक पातळीवर यश मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कॅनडामधील रोजगाराच्या संधींबाबत माहिती देताना रेवा रॉय यांनी नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करण्याची गरज अधोरेखित केली. वेगाने बदलणाऱ्या जागतिक रोजगार बाजारात टिकून राहण्यासाठी सतत अद्ययावत राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कौशल्यविकास आणि तांत्रिक प्रावीण्य यांच्या आधारे भारतीय युवकांसाठी परदेशात मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

इंग्लंडमध्ये शिक्षण घेताना आलेल्या अनुभवांचे कथन करताना धम्मचारी सुदिप्ता यांनी परदेशातील शैक्षणिक प्रवासातील आव्हाने मांडली. वंचित समाजाच्या प्रश्नांना जागतिक स्तरावर मांडण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच परदेशातही बाबासाहेबांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते, असे त्यांनी नमूद केले.

युरोपियन देशांमध्ये शिक्षण घेतल्यानंतर येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत विरेंद्र घुटके यांनी मार्गदर्शन केले. प्रत्येक देशातील रोजगाराच्या संधी समजून घेताना स्थानिक भाषा शिकणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शिक्षणादरम्यान इंटर्नशिप करण्याचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून कौशल्यविकासाला चालना मिळते, असे स्पष्ट केले.

## गझलनवाज भीमराव पांचाळे यांच्या गझलांनी रसिक मंत्रमुग्ध

विचार प्रबोधन पर्वात दुसऱ्या दिवशी सायंकाळच्या सत्रात गझलनवाज भीमराव पांचाळे यांच्या गझलांचे सादरीकरणाने झाले. त्यांच्या सुरेल आणि भावपूर्ण गायकीने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. गझलांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक जाणिवा आणि मानवी मूल्यांचा वेध घेतला. यानंतर सुप्रसिद्ध गायक रवींद्र खोमणे, अमोल यादव, सोमनाथ फटाके व सहकाऱ्यांनी 'भीम उत्सव' अंतर्गत महामानवांच्या विचारांना वंदन करणारी प्रेरणादायी गीते सादर केली. या गीतांमधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत समता, बंधुता आणि न्याय यांचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमात संगीत, विचार आणि समाजप्रबोधन यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला. उपस्थितांनी कलाकारांच्या सादरीकरणाला टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

# दुर्मिळ आजारावर मात; डीपीयू हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार

## डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये द्विपक्षीय फिओक्रोमोसायटोमा या दुर्मिळ आजाराचे यशस्वी उपचार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी येथील डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये २८ वर्षीय महिला रुग्णामध्ये आढळलेल्या द्विपक्षीय फिओक्रोमोसायटोमा या दुर्मिळ आजाराचे यशस्वी उपचार करण्यात आले . सदर रुग्ण उच्च रक्तदाब व मधुमेहाच्या तक्रारींसह एंडोक्रायनोलॉजी ओपीडीमध्ये उपचार घेत होती. तपासणीदरम्यान कुटुंबात मधुमेहाचा ठळक इतिहास आढळून आल्याने जनुकीय तपासणी करण्यात आली.**



या तपासणीत व्हॉन हिपेल-लिंडाऊ (VHL) जीनमध्ये बदल असल्याचे निष्पन्न झाले, जो दुर्मिळ जनुकीय विकार असून विविध प्रकारच्या ट्युमरच्या निर्मितीशी संबंधित आहे. पुढील तपासणीत रुग्णाच्या दोन्ही ॲड्रिनल ग्रंथींमध्ये फिओक्रोमोसायटोमा असल्याचे निदान झाले. या ट्युमरमुळे कॅटेकोलामाइन्सचे अतिउत्पादन होऊन रक्तदाबात तीव्र चढ-उतार होण्याचा धोका निर्माण होतो. एंडोक्रायनोलॉजी, युरोलॉजी, लॅप्रोस्कोपिक सर्जरी, ॲनेस्थेशिया व क्रिटिकल केअर विभागांच्या समन्वित बहुविद्याशाखीय पद्धतीने रुग्णावर यशस्वी उपचार करण्यात आले.

पुढील तपासण्या, ज्यामध्ये रक्त तपासण्या व एमआरआयचा समावेश होता, यामधून द्विपक्षीय फिओक्रोमोसायटोमा असल्याचे निदान निश्चित झाले. हा अत्यंत दुर्मिळ व वैद्यकीयदृष्ट्या आव्हानात्मक आजार आहे. या प्रकरणाचे व्यवस्थापन डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, पिंपरी, पुणे येथील डॉ. अनिल मेनन (प्राध्यापक व विभागप्रमुख, एंडोक्रायनोलॉजी), डॉ. सुनील म्हस्के (युरोलॉजिस्ट), डॉ. राहुल व्ही. शहाबादी (ॲनेस्थेशियोलॉजिस्ट) आणि डॉ. मनोज डोंगरे (सीनियर कन्सल्टंट सर्जिकल ऑन्कोलॉजी, एचपीबी सर्जरी) यांच्या बहुविद्याशाखीय टीमने केले. डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, पिंपरी, पुणे चे डॉ. अनिल मेनन यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णावर शस्त्रक्रियेपूर्व ४ ते ६ आठवड्यांचा सखोल उपचार करण्यात आला, ज्यामध्ये रक्तदाबाचे कडक नियंत्रण आणि रक्तातील साखरेचे संतुलन राखण्यात आले. फिओक्रोमोसायटोमा सारख्या हार्मोनली सक्रिय ट्युमरमध्ये शस्त्रक्रियेपूर्व तयारी अत्यंत महत्त्वाची ठरते, कारण यामुळे शस्त्रक्रियेतील व त्यानंतरच्या गुंतागुंतीचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. दोन्ही बाजूंना ट्युमर असल्याने डॉ. सुनील म्हस्के यांच्या नेतृत्वाखालील शस्त्रक्रिया टीमने लॅप्रोस्कोपिक पद्धतीने एकाच टप्प्यात द्विपक्षीय ॲड्रिनलेक्टॉमी करण्याचा निर्णय घेतला. उजव्या बाजूचा ट्युमर ५ X ४ सेमी, तर डाव्या बाजूचा ४ X ३ सेमी आकाराचा होता. सुमारे ३ तासांत ही शस्त्रक्रिया पूर्ण झाली आणि सुमारे १०० मिली इतकाच रक्तस्राव झाला. दोन्ही ॲड्रिनल ग्रंथींचा सहभाग आणि इन्फेरिअर वेना कावा (IVC) सारख्या महत्त्वाच्या रक्तवाहिन्यांच्या जवळीकतेमुळे ही शस्त्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या अत्यंत जटिल होती. तरीही सर्व आव्हानांवर मात करत शस्त्रक्रिया टीमने कोणतीही गुंतागुंत न होता एकाच टप्प्यात दोन्ही ट्युमर यशस्वीरीत्या काढून टाकले.

ॲनेस्थेशियाच्या दृष्टीनेही ही शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक ठरली. रक्तदाब व हृदयगतीत अचानक व तीव्र चढ-उतार होण्याचा धोका असल्याने शस्त्रक्रियेदरम्यान अत्यंत नियंत्रण आवश्यक होते. अशा दुर्मिळ ट्युमरवर दोन्ही बाजूंनी, तेही एकाच वेळी आणि लॅप्रोस्कोपिक पद्धतीने शस्त्रक्रिया करणे हे ॲनेस्थेशिया टीमसमोर मोठे आव्हान होते. डॉ. राहुल व्ही. शबादी यांच्या मार्गदर्शनाखाली सतत मॉनिटरिंग आणि कुशल हस्तक्षेपांच्या साहाय्याने शस्त्रक्रियेदरम्यान होणारे हेमोडायनॅमिक बदल प्रभावीपणे नियंत्रित करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती सुरळीत राहिली आणि कोणतीही गुंतागुंत आढळली नाही. हिस्टोपॅथॉलॉजी तपासणीत फिओक्रोमोसायटोमा असल्याचे निश्चित झाले असून कर्करोगाचे कोणतेही लक्षण आढळले नाही. दोन्ही ॲड्रिनल ग्रंथी काढून टाकल्यानंतर रुग्णाला आयुष्यभरासाठी कॉर्टिकोस्टेरॉइड रिप्लेसमेंट थेरपी सुरू करण्यात आली असून सध्या तिची प्रकृती स्थिर आहे. विशेष म्हणजे सध्या रुग्णाला मधुमेह नियंत्रणासाठी औषधांची आवश्यकता भासत नाही.

मूलभूत जनुकीय कारण लक्षात घेता, पुढील काळात पुनरावृत्ती टाळण्यासाठी व हार्मोनल संतुलन राखण्यासाठी रुग्णावर दीर्घकालीन फॉलोअप ठेवण्यात येणार आहे. या प्रकरणातून दुर्मिळ व उच्च-जोखमीच्या एंडोक्राइन आजारांच्या व्यवस्थापनात लवकर जनुकीय निदान, शस्त्रक्रियेपूर्व सखोल तयारी आणि बहुविद्याशाखीय दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित होते. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे चे प्र-कुलपती मा. डॉ. भाग्यश्री पी. पाटील यांनी सांगितले, “या दुर्मिळ आजाराच्या तपासणीतील प्रगत तंत्रज्ञान आणि विविध तज्ज्ञांच्या समन्वित वैद्यकीय सेवेमुळे या आजारांचे वेळीच निदान करून त्यावर अधिक परिणामकारक उपचार करणे शक्य होत आहे. रुग्णांच्या आरोग्य परिणामांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि अखंडित उपचारसेवा देण्यासाठी अशा एकत्रित पद्धती अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. त्याचबरोबर सहानुभूतीपूर्ण आणि रुग्णकेंद्री दृष्टिकोन हा आमच्या उपचार व्यवस्थेचा मुख्य आधार आहे.

# पिंपळे सौदागरच्या शिरपेचात मानाचा तुरा ! कु.रुग्वेद शेवाळेची 'सैनिक शाळे'कडे झेप

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर पिंपळे सौदागरमधील 'साई वैभव' (सेव्हन स्टार लेन) येथील अवघ्या एका बालकाने यशाचे उत्तुंग शिखर सर केले आहे. कु.रुग्वेद शशिकांत शेवाळे याने अत्यंत कठीण समजली जाणारी 'सैनिक शाळा प्रवेश परीक्षा २०२६' पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होऊन अमरावतीनगर (तामिळनाडू) येथील सैनिक शाळेत आपले स्थान निश्चित केले आहे. रुग्वेदच्या या गौरवशाली यशाबद्दल भाजप शहराध्यक्ष व नगरसेवक श्री शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते त्याला सन्मानचिन्ह देत गौरविण्यात आले.**



## अथक परिश्रमातून 'तिहेरी' यशाची मोहोर

देशभरातून जवळपास २ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. त्यामधून रुग्वेदने केवळ लेखी परीक्षाच नव्हे, तर अत्यंत कठीण समजली जाणारी वैद्यकीय चाचणीही यशस्वीरीत्या पार केली. विशेष म्हणजे, त्याने केवळ सैनिक शाळाच नाही, तर जवाहर नवोदय विद्यालय आणि राष्ट्रीय मिलिटरी स्कूल या दोन्ही प्रतिष्ठित शाळांच्या प्रवेशासाठीही पात्रता सिद्ध करत अथक परिश्रम घेत रुग्वेद शेवाळेनी यशाची 'हॅट्रिक' साधली आहे.

यावेळी श्री शशिकांत शेवाळे व शेवाळे परिवार तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते. रुग्वेदच्या या तिहेरी यशाचे सर्वत्र कौतुक होत असून, त्याने आपल्या कतृत्वाने इतर विद्यार्थ्यांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

## शत्रुघ्न (बापू) काटे यांनी थोपटली पाठीवर कौतुकाची थाप

या प्रसंगी श्री शत्रुघ्न काटे म्हणाले की, "आजच्या पिढीतील मुलांनी देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून अशा स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवणे, ही संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाची गोष्ट आहे. रुग्वेदने केवळ शेवाळे परिवाराचेच नव्हे, तर आपल्या परिसराचे नाव राष्ट्रीय पातळीवर पोहोचवले आहे. त्याच्या या यशात त्याच्या पालकांचे आणि शिक्षकांचे मोठे योगदान आहे. भविष्यात रुग्वेद एक उत्तम लष्करी अधिकारी बनून देशाची सेवा करेल, असा मला विश्वास आहे."

# चिखली प्राधिकरणामध्ये दूषित पाणीपुरवठा

## कायमस्वरूपी मार्ग काढण्याची सोसायटी फेडरेशन तथा भाजपा पदाधिकारी शिवराज लांडगे यांची मागणी

**महाईन्यूज |**
**पिंपरी-चिंचवड**

**चिखली प्राधिकरण परिसरातील सेक्टर 4 ते 13 मधील अनेक सोसायट्यांना गेल्या काही दिवसांपासून दूषित व अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या असून, विशेषतः सेक्टर 11 ते 13 या भागात परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे समोर आले आहे. अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे अनेक नागरिक आजारी पडल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत.**



> सेक्टर 11 ते 13 या भागात अलीकडे अशुद्ध पाणीपुरवठ्याबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत. त्याच अनुषंगाने सोसायटी फेडरेशनचे पदाधिकारी आणि काही सोसायटी धारकांनी महानगरपालिकेत जाऊन मुख्य अभियंत्यांसोबत चर्चा केली आहे. येत्या दोन दिवसांत या परिसरात पाण्याची तपासणी करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले आहे. मात्र दोन दिवसांत शुद्ध पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही, तर नागरिकांना सोबत घेऊन मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडले जाईल.
>
> – **शिवराज लांडगे,** भाजपा मंडल अध्यक्ष

या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, पदाधिकारी तसेच भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी शिवराज लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्री. ओबासे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीत सेक्टर 11 ते 13 मधील दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होत असलेल्या परिणामांकडे लक्ष वेधण्यात आले.

यावेळी मुख्य अभियंत्यांनी सध्या महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा यंत्रणेतून पुरवठा होणारे पाणी शुद्ध असल्याचे सांगितले. मात्र ज्या ठिकाणी अशुद्ध पाणीपुरवठ्याच्या तक्रारी येत आहेत, त्या भागात महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष जाऊन पाण्याचे नमुने घेतील आणि त्याची तपासणी केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

पिंपरी चिंचवड शहरातील प्रदूषित पाणीपुरवठ्याच्या संदर्भात नुकतीच राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी शहरातील पवना व इंद्रायणी नद्यांच्या विविध बंधाऱ्यांची पाहणी करून प्रदूषणाबद्दल आढावा घेतला व संबंधित विभागाला सुचनाही केल्या, यावेळी शहराला सुरक्षित आणि स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत आमदार महेश लांडगे यांच्यासह शहरातील विविध नेत्यांनी पंकजा मुंडे यांना विविध उपाययोजना सुचविल्या.

पण सध्या चिखली परिसरातील दूषित पाणीपुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर चिखली प्राधिकरणातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, तातडीने पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी करून कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी होत आहे.

# १८ एप्रिल २०२६ रोजी पीसीसीओई निगडी इथे भव्य रोजगार मेळावा

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीरिंग (पीसीसीओई), निगडी, पुणे येथे शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता "पीसीसीओई जॉब फेअर – २०२६" चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम भारत सरकारच्या बोर्ड ऑफ अँप्रेन्टीसशिप ट्रेनिंग (BOAT), महाराष्ट्र असोसिएशन ऑफ टीपीओ (MATPO),आणि ऑल इंडिया टीपीओ असोसिएशन (AITPO) यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असून, विद्यार्थ्यांसाठी नोकरी, अप्रेंटिसशिप आणि इंटर्नशिपच्या मोठ्या संधी उपलब्ध असणार आहेत अशी माहिती पीसीईटी सेंट्रल प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता व महाराष्ट्र असोसिएशन ऑफ टीपीओ आणि ऑल इंडिया टीपीओ असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी दिली.**




या जॉब फेअरमध्ये डिप्लोमा, बीई/बीटेक,बीएससी, बीसीएस, बीसीए, बीए, बीकॉम, बीबीए, बीफार्म, एमबीए, आयटीआय तसेच इतर विविध अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना सहभागाची संधी मिळणार आहे. २०२६ बॅचचे अंतिम वर्षाचे विद्यार्थी, २०२७ बॅचचे प्री-फायनल वर्षातील विद्यार्थी तसेच जून/जुलै २०२५, २०२४, २०२३, २०२२ आणि २०२१ मध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी देखील या जॉब फेअरसाठी पात्र असतील. उमेदवारांना नोकरी, अप्रेंटिसशिपच्या व इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या जॉब फेअरच्या आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार श्री. ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा श्रीमती पद्माताई भोसले, सचिव श्री. विठ्ठल काळभोर, खजिनदार श्री. शांताराम गराडे, ट्रस्टी श्री. हर्षवर्धन पाटील, युवा उद्योजक श्री. नरेंद्र लांडगे, युवा उद्योजक श्री. अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी तसेच बोट चे संचालक श्री. पी. एन. जुमले, उपसंचालक श्री. एन. एन. वडोदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे.

### विविध कंपन्यांचा सहभाग

या जॉब फेअरमध्ये नामांकित अशा कंपन्यांचा सहभाग असणार आहे. त्यामध्ये कमिन्स इंडिया (CUMMINS INDIA), जॉन डिअर इंडिया (JOHN DEERE INDIA), दाना इंडिया (DANA INDIA), पियाजिओ व्हेईकल्स (PIAGGIO VEHICLES), प्रीमियम ट्रान्समिशन (PREMIUM TRANSMISSION), फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स (FLASH ELECTRONICS), सँडविक (SANDVIK), फियाट इंडिया (FIAT INDIA) यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांसह सुमारे १०० कंपन्या सहभागी होणार आहेत. आतापर्यंत सुमारे 70 कंपन्यांनी या जॉब फेअर साठी रेजिस्ट्रेशन केले आहे व त्यामध्ये सुमारे ६,०४५ रिक्त पदे उपलब्ध असणार आहेत.